Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक ५(२)] सोमवार, जानेवारी १३, २०२०/पौष २३, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १४.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**वाचा :—**(१) शासन अधिसूचना, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९.

क्रमांक जि.प.पं.स.-निवडणूक-कावि ८७-२०२०.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २ ड (२) ते (५) मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यामध्ये महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाचा पंचायत समित्यांच्या (भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २४४ अन्वये राष्ट्रपतीने जाहीर केलेल्या अनुसूचित क्षेत्रात पूर्णतः येणा-या पंचायत समिती वगळून) सभापतीच्या पदाचे नागपूर जिल्ह्यास वाटप करण्यात आले आहे ;

आणि ज्याअर्थी, पंचायत समिती सभापती आरक्षण काढताना सन २०११ ची जनगणना विचारात घेतलेली आहे. उक्त नियम २ (फ) पोट-नियम (२) अ व ब (२) मधील तरतुदीनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाची पदे अशा जाती किंवा जमातीचा लोकसंख्येची पंचायत समितीच्या एकूण लोकसंख्येशी टक्केवारी सर्वाधिक अधिक असेल अशा पंचायत समितीपासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने आरक्षण वितरीत करण्यात आले ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियम २ फ (क) अ व ब मधील तरतुदीनुसार नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखून ठेवावयाची पदे जिल्ह्यातील पंचायत समित्यामध्ये सोडत काढून वितरीत करण्यात आली. तसेच उक्त नियम २ फ, पोट-नियम (५) अ व ब मधील तरतुदीनुसार महिलासाठी राखून ठेवावयाची पदे (यापूर्वी सन २०१४ चे त्या त्या प्रवर्गातील महिलांचे आरक्षण वगळून सोडत काढून वितरीत करण्यात आली).

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समितीचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ चे नियम २ क मधील पोट-नियम २ (अ), ३ (अ), ४ (अ), ५ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी, रविंद्र ठाकरे, नागपूर जिल्हाधिकारी याद्वारे नागपूर जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सभापतीचे पदे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जातीसह) बिनराखीव/अनारक्षित आणि महिला (अशा जाती, जमाती आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसह) अनुसूचीसमोर दर्शविलेल्या पदाचे पंचायत समिती करीता राखीव पदे म्हणून अधिसूचित करीत आहे.

## अनुसूची

| अ. क्र. | पंचायत समितीचे नाव | सभापती पदाचे आरक्षण |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | नरखेड | सर्वसाधारण (महिला) |
| २ | काटोल | अनुसूचित जाती |
| ३ | कळमेश्वर | सर्वसाधारण |
| ४ | सावनेर | सर्वसाधारण (महिला) |
| ५ | पारशिवनी | अनुसूचित जाती (महिला) |
| ६ | रामटेक | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ७ | मौदा | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ८ | कामठी | सर्वसाधारण |
| ९ | नागपूर (ग्रामीण) | अनुसूचित जमाती (महिला) |
| १० | हिंगणा | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ११ | उमरेड | अनुसूचित जमाती |
| १२ | कुही | सर्वसाधारण (महिला) |
| १३ | भिवापूर | नागरिकांचा मागास प्रवर्ग |

शासकीय अधिसूचना ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे शासन अधिसूचना दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये आणि सूचित केल्यानुसार पंचायत समिती सभापती पदाचे आरक्षण दिनांक १७ जानेवारी, २०२० पासून सुरू होणा-या २½ (अडीच) वर्षाच्या कालावधी करीता लागू राहील.

**रविंद्र ठाकरे,**
जिल्हाधिकारी,
नागपूर.

नागपूर :
दिनांक १३ जानेवारी २०२०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.